| | |
|---|---|
| | अहमदनगर जिल्हा परिषद<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर |



| | | |
|---|---|---|
| वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>दुरध्वनी क्रमांक वैयक्तिक :-<br>कार्यालय :- | ७३८७३ ४८७९०<br>०२४१-२४३०५४४ | जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>सिव्हिल हॉस्पिटल<br>कंपाऊंड,अहमदनगर |
| Email-id | dttnagar@rediffmail.com | |



जा.क्र./जिप्रके अ.नगर/चहा,जेवण,नाष्टा दरपत्रके /३४२२ /२०२४ दि.२२/०७/२०२४

२४।७।२०२४

प्रति,

.......................................

.......................................

.......................................

**विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर या संस्थेसाठी चहा,नाष्टा व जेवण पुरवठा करणे दरपत्रक पाठविणेबाबत....**

**संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि.१९/०७/२०२४**

उपरोक्त विषयान्वये जिल्हा प्रशिक्षण केंद्र व आरोग्य विभाग जिल्हा परिषद अहमदनगर करीता सन.२०२४-२५ या कालावधीत प्रशिक्षणार्थीना व सभेस उपस्थित असणा-या अधिकारी व कर्मचारी यांना चहा,नाष्टा व जेवण पुरवठा करणे करीता अधिकृत विक्रेता व पुरवठादार यांचे कडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सन.२०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या प्रशिक्षणाच्या मंजुर पीआयपी नुसार प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थीकरीता देण्यात येणा-या चहा,नाष्टा व जेवण यासाठी अंदाजे एकुण सत्र ४८ एकुण अपेक्षित प्रशिक्षणार्थी २९४५ व एकुण ५३६५ खानपान अपेक्षित आहे.तरी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर येथे प्रशिक्षणार्थीकरीता पुरविण्यात येणा-या चहा,नाष्टा व जेवण यासाठी स्थानिक व्यवसायिंकांकडुन दरपत्रके मागविणेसाठी अनुमती मिळालेली आहे.

तरी आपण आपल्या फर्मच्या नावे मागविल्याप्रमाणे सर्व दर भरुन दरपत्रक जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे नावे बंद पाकिटामधुन आठ दिवसाचे आत वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद सिव्हील हॉस्पीटल कंपाउंड अहमदनगर यांचेकडे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

लिफाफा क्रमांक १ :- तांत्रिक लिफाप-यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे.

१) पॅनकार्ड व आधारकार्ड
२) संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आवश्यक.
३) GST नोंदणी प्रमाणपत्र
४) GST थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र दि. ३१/०३/२०२४ अखेर.
५) आयकर थकबाकी नसल्याबाबतचा दाखला (आय.टी.सी.सी.) Income tax clearance दि. ३१/०३/२०२४ अखेर -
६) पुर्वानुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
७) उपहारगृह चालविणेबाबत अन्न व औषध प्रशासनाचे प्रमाणपत्र.
८) भोजन ठेका चालविण्याचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) जोडणे आवश्यक.
९) संस्थेकडे असलेल्या मनुष्यबळाचा तपशिल जोडणे.
१०) निविदा फी व बयाना रक्कम ऑनालाईन भरण्याची पावती.
११) बंधपत्र

## अर्टी व शर्ती :-

१) पुरवठा आदेश मिळाल्यापासुन दिलेल्या मुदतीत साहित्य स्वखर्चाने कार्यालय सांगेल तसे व तिथे पोहोच करावे लागेल.

२) निविदा धारकाने सादर केलेले दर हे पुरवठा आदेश दिनांकापासुन १ वर्षापर्यंत स्विकृतीस पात्र ठरतील.

३) अंदाजीत दर्शविलेल्या अन्नपुरवठा खरेदी कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे अगर काहीच खरेदी होणार नाही.

४) निविदा धारकाने पदार्थाचे दर सर्व करासह नमुद करावे, तसेच सर्व पदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.

५) चहा, जेवण व नाष्टा खरेदी करणेंबाबतचा दर लिफाफा क्र.२ मध्ये भरण्यात यावे.

६) निविदा कराराबाबतच्यासर्व सुचना व अटी काळजीपुर्वक वाचाव्यात आणि त्याप्रमाणेच निविदा भराव्यात नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार मान्य करण्यात येणार नाही.

७) निविदा उघडतेवेळी प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. यामध्ये निविदा अटी व शर्तीप्रमाणे सर्व कागदपत्रे या कार्यालयाच्या मागणीप्रमाणे अद्यावत असलेबाबतची खात्री करुन घेतल्यानंतर लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल लिफाफा क्र.१ मध्ये काही कागदपत्रे अपुर्ण अथवा कमी आढळुन आल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही.स्पर्धकाची निविदा रद्द केली जाईल सर्व कागपदत्र पुर्ण असल्यानंतरच दराचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

८) निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा शिथिल करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

९) निविदा स्विकारल्या नंतर भोजनालय सुरु करण्याचे कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्यावर त्वरीत उपहारगृह सुरु करावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

१०) उपहारगृह सुरु झाल्यावर काही तांत्रिक बाबी किंवा जेवणविषयी तक्रारी प्राप्त झाल्यास उपहारगृह बंद करण्याचे अधिकार या कार्यालयास राहीतील.

११) या कार्यालयात येणारे अधिकारी/कर्मचारी यांना प्रथम प्राधान्य राहील. आरोग्य विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी यांना उपहारगृहात भोजन करण्याची परवानगी राहील परंतु बाहेरील व्यक्तींना परवानगी राहणार नाही.

१२) प्रत्येक प्रमाणपत्रावर निविदा धारकाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

१३) उपहारगृहात कोणत्याही व्यक्तीला राहता येणार नाही. (प्रशिक्षणार्थींना रात्रीचे जेवण झाल्यावर रात्री १०.३० वाजता उपहारगृह बंद करावे.

१४) उपहारगृहात मद्यपान व धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील. तसे गैरवर्तन आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१५) प्रशिक्षणार्थी सत्रात सकाळी/ रात्री प्रत्यक्ष भोजन घेतील त्यानुसार देयक अदा केले जातील.

१६) उपहारगृहात काम करणा-या कामगार वर्गाचे पोशाख एकसमान,निटनेटके तथा स्वच्छ असणे बंधनकारक राहील. १८ वर्षावरील कामगारांनाच कामासाठी नियुक्त करावे.

१७) उपहारगृहात नेमण्यात आलेला कामगार वर्गाची नावांची यादी,पत्ता,आधारकार्ड, किमान वेतन आणि फोटो इ. अभिलेख कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. कोणत्याही कर्मचा-यास कामावरुन कमी केल्यास नविन कर्मचारी नेमल्यास कार्यालयास सुचित करावे.

१८) दरप्रक्रिये मध्ये दिलेले जेवणाचे मेनु नुसारच जेवण पुरविण्यात यावे यांची नोंद घेण्यात यावी. शिळे जेवण पुरविल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर जेवणाचे बिल अदा करण्यात येणार नाही.

१९) उपहारगृहात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी आहार पुरवठादाराची राहील व उपहारगृह उत्कृष्ठ स्वच्छता राखणे बंधनकारक राहील.

२०) प्रशिक्षणार्थीना भोजन वाढवण्यासाठी पुरवठादाराने आपले कर्मचारी नेमण्यात यावे. तसेच खाद्य पदार्थाच्या वितरणासाठी लागणारे फर्निचर कार्यालयाकडुन पुरविण्यात येईल. परंतु स्वयंपाकासाठी लागणारे साहीत्य, गॅस,इतर भांडी उपकरणे इ. या कार्यालयाकडुन पुरविण्यात येणार नाही.

२१) पाण्याचा वापर निव्वळ भांडी धुणे, भाजीपाला धुणे, स्वयंपाक करणे स्वयंपाकगृह/ उपहारगृहाची स्वच्छता या साठीच करता येईल. इतर बाबीसाठी पाण्याचा वापर करता येणार नाही.

२२) विजेचा वापर लाईट, पंखे, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, किचन मधील मिक्सर इ.साठी करता येईल. याशिवाय विजेवर चालणारी इतर उपकरणे वापरता येणार नाहीत

२३) **स्वयंपाकासाठी/ भोजन वाढणेसाठी नेमलेले कर्मचारी निरोगी असावेत**. सदर कर्मचाऱ्यांची तीमाही वैद्यकीय तपासणी करुन तसे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. तसे न-केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात यावा व पुरेसे कर्मचारी ठेवावेत.

२४) जेवणाचा/ नास्ताचा साप्ताहिक मेनुकार्ड उपहारगृहाच्या दर्शनी भागात लावावा.त्यानुसारच जेवन देण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

२५) नाष्टयाचा दररोजचा मेनु ठरल्याप्रमाणेच नाष्टा प्रशिक्षणार्थींना दिला जाईल यांची दक्षता घ्यावी तसे न झाल्यास त्या दिवसांचा नास्ताचे व जेवणाचे बील अदा केले जाणार नाही.

२६) दररोज सकाळी नास्ता मध्ये पोहे, उपमा, शिरा, वडा सांबर, इडली सांबर, उसळ, उसळपाव इ. नास्ता हा चवदार असावा. यापैकी एक मेनु दिला जावा दररोज सारखाच मेनु दिल्यास नास्ता दिला गेला नाही असे समजण्यात येईल.

२७) नास्ता/ जेवण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीचे सकाळ संध्याकाळची हजेरी उपहारगृहात ठेवावी ज्यांनी नास्ता/ जेवण घेतले त्यांचेच बील अदा करण्यात येईल व तसेच बीलावर संबधीत सत्र समन्वयका कडुन प्रमाणीत करुन घ्यावे.

२८) स्थानिक प्रशिक्षणार्थी रात्री वसतीगृहात राहत नाहित प्रशिक्षण सत्र संपल्यानंतर घरी निघुन जातात अशा प्रशिक्षणार्थीचे रात्रीचे भोजनाचे बील अदा केले जाणार नाही.

२९) अन्नविषबाधा होऊन शारिरीक/ जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेचा ठेकेदारांची राहील.

३०) स्वयंपाकगृह/ उपहारगृहाचे नुकसान/ मोडतोड, पुरविलेले फर्निचर, साहीत्य इ.हरविणे/ मोडतोड/ नुकसान इ. उपहारगृह ठेकेदाराकडुन वसुलपात्र राहील व प्रचलित नियमांचे आधारे ते वसुल करण्यात येईल.

३१) उपहारगृह चालु करणे बाबत आदेश प्राप्त झाल्या नंतर ८ दिवसात आत करार पत्र रु.१००/- कार्ट फी स्टॅम्प पेपर करावे. तसेच नियमाप्रमाणे पुरवठा करावयाच्या किमतीच्या २.५ टक्के अनामत रक्कम रु.२००००/- वैद्यकिय अधिकारी,जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अहमदनगर यांचे खातेवर सुरक्षाठेव रक्कम जमा करण्यात यावी.

३२) उपहारगृहातील कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणार्थी / प्रशिक्षक यांचेशी आदराने वागणे अपेक्षित आहे. वागणुकीबाबत प्रशिक्षणार्थी/ प्रशिक्षक यांची तक्रार प्राप्त झाल्यास सदरील कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

३३) खाद्य पदार्थाचा दर्जा समाधानकारक नसल्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांना राहील.

३४) काही कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे तुम्हाला शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देऊन करार संपुष्टात करण्यात येईल.

३५) प्रशिक्षणार्थींनी फिडबॅक फॉर्म मध्ये जेवणाच्या बाबतील ५पैकी सरासरी ३ पेक्षा कमी गुण मिळाल्यास त्या प्रशिक्षण सत्राच्या जेवणाच्या देयकातुन २० टक्के रक्कम कपात करण्यात येईल. तसेच तीन प्रशिक्षण सत्राच्या फिडबॅक फॉर्म मध्ये ३ पेक्षा कमी गुण मिळाल्यास ठेका रद्द करण्यात येईल. व पुढील न्युनतम निविदा धारकास **एल१** दरावर(न्यूनतम दरावर)ठेका देण्यात येईल.

३६) प्रशिक्षणार्थीचे जेवणाचे देयके प्रशिक्षण संपल्यानंतर ७ दिवसातच्या आत दयावे.देयक अदा करताना नियमानुसार आयकर व जी.एस.टी.कपात करण्यात येईल. देयक सादर करतांना वस्तू व सेवा कर (जी.एस.टी) लावुनच देयक सादर करावे.अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येतील.

Scanned with OKEN Scanner

३७) **उपहारगृहाच्या ड्रेनेज लाईन मध्ये कचरा टाकू नये.ओला कचरा व कोरडा कचरा स्वतंत्र ठेवण्यात यावे व कचऱ्याची विल्हेवाट आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.** कचऱ्याची विल्हेवाट करण्याकामी लागणारे साहित्य (पिशवी व इतर) आपल्या स्तरावरुन पुरवठा करण्यात यावा.

३८) निविदा सुचना व निविदा धारकांना पुरविण्यात आलेल्या सर्वसाधारण सुचनांमध्ये नमुद केलेले नियम निविदाधारकांना बंधनकारक राहील.

३९) सर्वात कमी किमंतीची निविदा स्विकारण्यास कार्यालय बांधील नाही.

४०) अ) सकाळचा चहा :- सकाळी ९.०० ते १०.३०
ब) सकाळचा नास्ता :- सकाळी ९.०० ते १०.३०
ब) दुपारचे जेवण :- दुपारी १.०० ते ३.००
क) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.००
ड) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ९.३०

४१) लिफाफा क.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणेच व दिलेल्या आदेशा प्रमाणे सर्व पदार्थ दुपारच्या व रात्रीच्या जेवणात देणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली निविदा रद्द करण्यात येईल.

४२) निविदा स्विकारल्यानंतर चहा, जेवण, व नाष्टा सुरु करण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन मागणी नुसार जिल्हा प्रशिक्षण केंद्र,एनएचएम विभाग, जिल्हा परिषद मध्ये होणा-या आढावा सभा येथे ठरलेल्या दराप्रमाणेच स्वखर्चाने पुरवठा करावा लागेल अन्यथा आपले टेंडर रद्द करण्यात येईल.

४३) कोणतेही कारण न दाखविता निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा हक्क या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

४४) निविदांमध्ये दिलेले पदार्थाखेरीज इतर कोणतेही पदार्थ ठेवता येणार नाही.

४५) चहा,नाष्टा व जेवण ट्रेनिंगच्या ठिकाणी मागणी प्रमाणे जागेवर मंजुर दराप्रमाणे स्वखर्चाने पोहोच करावे लागेल.

४६) जर पुरवठा धारकाने विहित कालावधीत चहा,नाष्टा व जेवणाचा पुरवठा केला नाही तर पुढील कार्यवाहीस पात्र राहील.

४७) पुरवठा केलेल्या अन्नपदार्थाची मंजुर कलेल्या दराप्रमाणे देयक सादर करावयाचे आहे.या निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचे वाद झाल्यास मा.अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

४८) पुरवठा आदेश देण्यापूर्वीलिफाफा क्रमांक-१ मुळ तांत्रिक कागदपत्रामध्ये तफावत आढळल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांना राहील यांची नोंद घ्यावे.

४९) पुरवठा आदेश दिल्यानंतर ८ दिवसाच्या आत वरील अटी मान्य असल्याबाबत रुपये १०० च्या रेव्हेन्यु स्टॅम्पवर लिहून देणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

# लिफाफा क्रमांकः-०२ (निविदा)

१) निविदा धारकाचे नांव व सुंपर्ण पत्ता——————————————————

२) कामाची मुदतः-एक वर्ष

## दैनंदिन आहारसेवा

| अ.क्र | बाब | पदार्थाचे नाव | अंदाजीत जीएसटी सहदर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| | | **(अ) साधे जेवण** | |
| १ | चहा | चहा<br>स्पेशल चहा,लेमन टी/काळा चहा/ या पैकी एक | |
| २ | कॉफी/ दुध | कॉफी,दुध यापैकी एक | |
| २ | नाष्टा/उपवासाचा नाष्टा | बटाटे वडे (२ प्रत्येकी १०० ग्रॅम) / ग्रॅम) / ईडली(४) सांबर अथवा चटणी / मेंदूवडा(२ प्रत्येकी ५० ग्रॅम) सांबर/ डोसा(१) सांबर /उत्तापा(१) सांबर / वडापाव / मिसळ व २ पाव/ (२०० ग्रॅम)=प्लेट पोहे/ उपमा/ शिरा/ भजी- पाव, पावभाजी (२ पाव १०० ग्रॅम भाजी), समोसा २ नग ( प्रत्येकी १०० गॅम) इतर(रोज बदलून नास्ता पुरविणे) या पैकी एक किंवा<br>नाष्टा -साबुदाणा वडा व दोन केळी/इतर फळ + दही किंवा<br>बटाटा चिवडा (१५० ग्रॅम) व दोन केळी + दही | |
| ३ | दुपारचे साधे शाकाहारी फुल जेवण / उपवासाचे फराळ | गव्हाच्या पोळया, दोन भाज्या,(एक पातळ व एक सुकी भाजी)वरण, भात, पापड, लोणचे,कांदा, लिंबु, कोशबींर, (फुल जेवनात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील)व श्रीखंड/गुलाब जाम/मोतीचुर लाडू/मलई बर्फी/बासुंदी/या पैकी एक स्वीट(एकवाटी) (१०० ग्रॅम) किंवा<br>१)साबुदाणा खिचडी/साबुदाणा वडा,चटणी/भगर/शिजवलेली बटाटे भाजी यापैकी एकव अमर्यादित २ प्रकारची फळे किंवा<br>२)बटाटाचिवडा/वेफर यापैकी एक अमर्यादित व २ प्रकारची फळेकिंवा<br>३)मलई बर्फी,बासुंदी यापैकी एक अमर्यादित व २ प्रकारची फळे | |
| ४ | रात्रीचे साधे शाकाहारी फुल जेवण / उपवासाचे फराळ | गव्हाच्या पोळया,दोन भाज्या,(एक पातळ व एक सुकी भाजी)वरण, भात,पापड,लोणचे,कांदा,लिंबु,कोशबींर,वडीशोप,(फुल जेवनात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील)व श्रीखंड/गुलाबजाम/मोतीचुर लाडू/मलई बर्फी/बासुंदी/या पैकी एक स्वीट(एकवाटी)(१००ग्रॅम) किंवा<br>१)साबुदाणा खिचडी/साबुदाणा वडा,चटणी/भगर/शिजवलेली बटाटे भाजी यापैकी एक अमर्यादित व २ प्रकारची फळेकिंवा<br>२)बटाटाचिवडा/वेफर यापैकी एक अमर्यादित व २ प्रकारची फळे किंवा<br>३)मलई बर्फी,बासुंदीयापैकी एक अमर्यादित व २ प्रकारची फळे | |
| | | (अ) एकूण | |
| | | | |
| | | (अ)एकुण रक्कम | |

नविदा धारकाची सही नांव व
शिक्का

Scanned with OKEN Scanner

# भोजन सेवा कामाची व्याप्ती व स्वरुप

**कामाचे स्वरुप -**

१) या कार्यालयातील प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना तीन वेळेस चहा सकाळी नास्ता व दुपारी जेवण व रात्री जेवण पुरविणे बंधनकारक राहील.व इतर वेळेस वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्, अहमदनगर,यांचा आदेशानुसार भोजन पुरविणे बंधनकारक राहील.

२) **कंत्राटदाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुरवावयाच्या सुविधा-**
भोजन कक्षात नेमण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यास गणवेश व ओळखपत्र पुरविणे बंधनकारक राहील.

३) **कंत्राटदारास (ठेकेदारास) द्यावयाचा मोबदला -**

अ)कंत्राटदारास (ठेकेदारास) भोजनसेवेचा मोबदला अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

ब) देयक अदा करताना नियमानुसार आयकर (टिडीएस) व जीएसटी कपात करण्यात येईल.

४) **कार्यालया कडुन ठेकेदारांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीबाबत.**

अ) पाणी पुरवठा
ब) विज कनेक्शन
क) टेबल व खुर्च्या

या शिवाय उपहार कक्षात तयार करण्यात येणाऱ्या भोजन सेवेची पहाणी अचानकपणे केंव्हाही केली जाईल व त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील.असामाधानकारक सेवेबाबत लेखी समज देण्यात येईल व भोजनसेवात सुधारणा न झाल्याचे दिसुन आल्यास नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल. कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी आहार सेवा रद्द करण्यात येतील व अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम जप्त करण्यात येईल.

(डॉ.बापुसाहेब नागरगोजे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,अहमदनगर

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर,**

- मा.उपसंचालक आरोग्य सेव,नाशिक मंडळ,नाशिक.
- मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with OKEN Scanner

# बधपत्र

मी/आम्ही गांर्भीयपुर्वक नमुद करीतो की, मी/आम्ही वर नमुद केलेल्या अन्नपदार्थ पुरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदेसोबत असलेल्या दरपत्रकामध्ये नमुद करीत आहे/आहोत. जर माझी/आमची निविदा स्विकृत करण्यात आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधील राहु. या अटि व शर्तीचा भंग मी /आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनिय कार्यवाहीस पात्र राहील. मी /आम्ही निविदेत दिलेल्या चहा,नाष्टा च जेवण पुरवठा दरपत्रकामधील तपशिलानुसार सर्व अटी करीता बांधील राहील. वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

निविदा संपुर्णपणे मान्य करणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे तसेच अंशतः मान्य करणे अथवा संपुर्णतः नाकरण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी राखुन ठेवलेला आहे. या बाबत माझी काहीही हरकत नाही.

स्थळ :-
दिनांक :-

**निविदा धारकाची सही व शिक्का**

नांवः- ____________________

पत्ताः- ____________________

Scanned with OKEN Scanner